पुढारी



पेठवडगाव : बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये निवड झालेल्या अशोकराव माने पोलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांचा सत्कार करताना विजयसिंह माने. सोबत अन्य.

# अशोकराव माने पॉलिटेक्निकच्या २५१ विद्यार्थ्यांची प्लेसमेंट निवड

**पेठवडगाव : पुढारी वृत्तसेवा**

वाठार येथील अशोकराव माने पॉलिटेक्निकच्या २५१ विद्यार्थ्यांची विविध बहुराष्ट्रीय कंपन्यांत निवड झाली. कोरोनाच्या महासंकटात अनेक कंपन्या बंद झाल्या, तर नोकऱ्यांमध्येही मोठी कपात झाली. तरुणांमध्ये बेरोजगारी वाढली. अशी परिस्थिती असताना पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांना मात्र गुणवत्तेमुळे नोकरी मिळाली आहे. कॉलेजने गेल्या तेरा वर्षांत विविध कंपन्यांशी केलेल्या सामंजस्य करारामुळे १०० टक्के प्लेसमेंट करण्यात कॉलेजला यश आले आहे, अशी माहिती संस्था अध्यक्ष विजयसिंह माने यांनी दिली.

यझिकी इंडिया, इस्लल प्रो पॅक, बजाज ऑटो, जॉन डिअर, थ्री एम इंडिया, केएसपीजी ऑटो अशा नामांकित बहुराष्ट्रीय कंपन्यांत विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.

या विद्यार्थ्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्हा परिषद सदस्या मनीषा माने, प्राचार्य वाय. आर. गुरव, ट्रेनिंग प्लेसमेंट ऑफिसर प्रा. फिरोज अमीन उपस्थित होते.

My Kolhapur Edition
Aug 24, 2021 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

सकाळ

# माने पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांची निवड

पेठवडगाव, ता. २३ : वाठार तर्फ वडगाव येथील अशोकराव माने पॉलिटेक्निकच्या २५१ विद्यार्थ्यांची विविध बहुराष्ट्रीय कंपन्यांत निवड झाली. कोरोनात कंपन्या बंद झाल्यामुळे नोकऱ्यांत कपात झाली. तरुणांमध्ये बेरोजगारी वाढली. अशी परिस्थिती असताना पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांना मात्र गुणवत्तेमुळे नोकरी मिळाली आहे. कॉलेजने तेरा वर्षांत विविध कंपन्यांशी केलेल्या सामंजस्य करारामुळे १०० टक्के प्लेसमेंट करण्यात कॉलेजला यश आले आहे, अशी माहिती संस्था अध्यक्ष विजयसिंह माने यांनी दिली.

यझीकी इंडिया, इस्लल प्रो पॅक, बजाज ऑटो, जॉन डिअर, थ्री एम इंडिया, केएसपीजी ऑटो अशा नामांकित बहुराष्ट्रीय कंपन्यांत विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. विद्यार्थ्यांना अद्ययावत तंत्रज्ञानाचे शिक्षण देण्याबरोबरच त्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्वाचा विकास करण्यासाठी अग्रक्रम दिला जातो. तीन वर्षांत शिक्षण घेऊन उत्तम पगाराची नोकरी देण्यासाठी आम्ही प्लेसमेंट सेल अधिक भक्कमपणे कार्यरत ठेवला आहे, अशी माहिती प्राचार्य वाय. आर. गुरव यांनी दिली. ट्रेनिंग प्लेसमेंट ऑफिसर प्रा. फिरोज अमीन उपस्थित होते.



**वाठार तर्फ वडगाव : निवड झालेल्या विद्यार्थिनीला पत्र देताना विजयसिंह माने. शेजारी सौ. मनीषा माने, सना अमीन, प्राचार्य पी. बी. घेवारी, डॉ. अजय मस्के, फिरोज अमीन.**

Kolhapur, Gadhinglaj-Today
24/08/2021 Page No. 2